RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार, २३ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : ११७ | दैनिक | किंमत : ₹५/-

Wednesday, 23 April 2025 | Year : 5 | Issue : 117 | Daily | Rate: Rs. 5/-




## जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांचा बेछूट गोळीबार

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन पर्वतावर फिरायला गेलेल्या पर्यटकांच्या गटावर दहशतवाद्यांकडून बेछूट गोळीबार झाल्याची माहिती मिळत आहे. प्राथमिक माहितीनुसार, याठिकाणी ट्रेकिंगसाठी गेलेल्या पर्यटकांवर काही अज्ञाक हल्लेखोरांकडून गोळीबार करण्यात आला. यात सहा ते सात जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. जखमी झालेल्यापैकी तीन लोक स्थानिक आणि तीन बाहेरचे लोक असल्याचे सांगितले जाते. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, बैसरन खोऱ्यात गोळीबाराचे आवाज ऐकू आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.या दहशतवादी हल्ल्यात किमान 20 जण जखमी झाले आहेत, तर किमान दोन जणांची प्रकृती नाजूक असल्याची माहिती मिळत आहे. मीडिया रिपोर्टनसार हा दहशतवादी हल्ला मंगळवारी दुपारी 2.30 वाजता झाला.

पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बैसरन पर्वतावर फक्त पायी किंवा घोड्यावरून जाता येते. निसर्गसौंदर्यामुळे या भागाला मिनी स्वित्झर्लंड म्हटले जाते. वाहन थेट पोहोचत नसल्यामुळे सुरूवातीला बचाव कार्यात अडथळे आल्याचे सांगितले जाते. भाजपाचे नेते रवींद्र रैना यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देत असताना पाकिस्तानी दहशतवाद्यांचा हल्ल्यामागे हात असण्याची शक्यता वर्तविली. जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी या हल्ल्याचा जाहिर निषेध व्यक्त केला. या घटनेत ज्यांना दुखापत झाली, त्या कुटुंबियांच्या मागे आम्ही ठामपणे उभे आहोत. या हल्ल्यामागे फक्त येथील शांतता भंग करून विनाकारण दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो. अशा हल्ल्याचे कधीही समर्थन करता येणार नाही.



"प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सध्या सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी जम्मू काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल गृहमंत्र्यांशी फोनवरून चर्चा केली. तसेच या संभाषणादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना घटनास्थळाला भेट देण्यासही सांगितले आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत दहशतवादी हल्ल्याच्या घटनेमुळे व्यथित झाल्याची भावना व्यक्त केली आहे. 'जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने व्यथित झालो आहे. मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे. या भ्याड दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्यांना सोडले जाणार नाही आणि त्यांच्याविरोधात कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांना परिणाम भोगावे लागतील' असे अमित शाह यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला केला आहे. पहलगाममधील बैसरन परिसरात दोन ते तीन दहशतवाद्यांनी केलेल्या या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याची, तर काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती येत आहे. दरम्यान, या दहशतवाद्यांनी पर्यटकांना आधी नाव विचारल्याची आणि हिंदू असल्याची ओळख पटल्यावर गोळीबार केल्याची धक्कादायक माहिती हल्ल्यात जखमी झालेल्या पर्यटकांनी दिली आहे.**

## 142 कोटींचे सावित्रीबाईंचे स्मारक ते कामगार संहिता

### मंत्रिमंडळाचे 8 मोठे निर्णय!

**मुंबई :** राज्य सरकारची आज (22 एप्रिल) आज मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. विशेष म्हणजे आजच्य मंत्रिमडंळ बैठकीच्या माध्यमातून सरकारने सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे स्मारक निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या स्मारकासाठी तब्बल 142 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच राज्य सरकारने कामगार कायद्यांतही मोठे बदल करण्याचे ठरवले आहे. याबाबतही सरकारने कामगारांसाठी महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यात येतील, असे ठरवले आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या योजनेतील घरांची निर्मिती आणि वितरण पद्धतीतही सुधारणा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.




ग्रामविकास विभाग : मौजे नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय. स्मारकासाठी 142.60 कोटी तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी 67.17 लाख रुपयांच्या तरतूदीस मंजुरी.

जलसंपदा विभाग : गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प, ता. पवनी, जि.भंडारा या प्रकल्पाच्या 25 हजार 972 कोटी 69 लाख रुपयांच्या तरतूदीस सुधारित प्रशासकीय मान्यता.

कामगार विभाग : राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करणार महसूल विभाग, विधी व न्याय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, गृहनिर्माण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## संसद सर्वोच्च, त्यापेक्षा मोठे काही नाही : उपराष्ट्रपती जगदीप धनखड

**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयावर टीका करतांना एक नवा वाद छेडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी निर्देश देणे योग्य नसल्याचे मत त्यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते. त्यांच्या आक्रमक भूमिकेवर टीका झाली. या टीकेनंतर त्यांनी आज पुन्हा 'संसद सर्वोच्च आहे', असे विधान करून हा वाद आणखी वाढवला. दिल्ली विद्यापीठाच्या एका कार्यक्रमात बोलत असताना त्यांनी म्हटले, 'संविधानानुसार संसदेपेक्षा कुणीही मोठे नाही. निवडून आलेले लोकप्रतिनिधी हेच संविधानाच्या आशयाचे खरे स्वामी आहेत.' 8 एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडूच्या प्रलंबित 10 विधेयकांबाबत निकाल देत असताना म्हटले की, राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवविलेल्या विधेयकांवर तीन महिन्यांच्या कालावधीत निर्णय घ्यावा. तमिळनाडूचे राज्यपाल आर.एन. रवी यांनी राज्य सरकारची विधेयके अडवून ठेवली होती. याबाबत राज्य सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या भूमिकेवरही टीका केली. या निकालावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जोरदार टीका केली. सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींना निर्देश देत आहे, अशी वेळ भारतावर येता कामा नये, अशी टिप्पणी त्यांनी केली होती. या टिप्पणीवर राज्यसभेचे माजी खासदार आणि ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल यांनी मात्र आक्षेप घेतला होता. उपराष्ट्रपतींचे विधान सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्व कमी करणारे आहे, असे ते म्हणाले.




## दुबईतही घुमला महापुरुषांच्या समतेचा जागर

### महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जागतिक स्तरावर

**दुबई :** दुबईत महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दोघांच्या विचारधारेचा जागर घडवत, शिक्षण, समता आणि सामाजिक परिवर्तनाच्या संकल्पाने हा प्रेरणादायी कार्यक्रम साजरा करण्यात आला. आखाती देशांतील, विशेषतः दुबई येथील अनिवासी भारतीयांनी, समाज परिवर्तनाच्या महान विचारांनी प्रेरित होऊन महात्मा फुले यांची 198 वी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती अभूतपूर्व उत्साहात साजरी केली. हा भव्य सोहळा आंबेडकर इंटरनेशनल मिशन यूएई यांच्या वतीने आयोजित फाउंडेशन आणि सत्यशोधक विचारमंच यांचाही उत्स्फूर्त सहभाग होता. दुबई येथील अल-नाहदा येथील लॅव्हेंडर हॉटेल येथे हा कार्यक्रम झाला. यावर्षी कार्यक्रमाची थीम होती 'सामाजिक परिवर्तनातून आर्थिक स्वावलंबलाकडे,' यावेळी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि आर्थिक शैक्षणिक विचारांना उजाळा देण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून लेखक, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती, संचालन राहुल सोनपिंपळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन अनिल मंगेश वाघाडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजन कदम यांनी केले. यामध्ये प्रदीप मोहिते, विकास जाधव, मोग्लान भगत, प्रशांत भेले, आशिष जीवने, अरिहंत फारतडे, अतुल शिरसाठ, सारिका इस देवगडे, शुभ जाधव, पल्लवी माहित, निकिता तायडे, योगिता शिरसाठ, लुम्बिनी यादव, सीमा, वैद्य, विजय धुताने, शरद जाधव, डॉ. विनेश खोब्रागडे आणि डॉ. पल्लवी कांबळे यांनी मोलाचा सहभाग दिला. आणि उपास्थितांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून राष्ट्रनिष्ठेचा संदेश दिला.




## युपीएससी नागरी सेवा अंतिम निकाल जाहिर




**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) नागरी सेवा परीक्षा, 2024 चा अंतिम निकाल जाहीर केला आहे. सप्टेंबर 2024 मध्ये लेखी परीक्षा झाली होती. तर, जानेवारी ते एप्रिल 2025 मुलाखती पार पडल्या होत्या. अखेर या दोन्ही सत्रांचा निकाल जाहीर झाला असून युपीएससी परीक्षेत शक्ती दुबे देशात अव्वल ठरली आहे. त्यानंतर हर्षिता गोयल दुसऱ्या क्रमांकावर आणि अर्चित डोंगरे तिसऱ्या क्रमांकावर आहेत. नागरी सेवा परीक्षा नियम, 2024 च्या नियम 20(4) आणि (5) नुसार 230 उमेदवारांची एकत्रित राखीव यादी देखील ठेवण्यात आली आहे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने अधिकृतपणे जाहीर केलेल्या निकालांमध्ये भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय परराष्ट्र सेवा (IFS), भारतीय पोलिस सेवा (IPS) आणि केंद्रीय सेवा, गट 'अ' आणि गट 'ब' मध्ये नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या 1009 उमेदवारांची यादी समाविष्ट आहे. upsc.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांना निकाल पाहता येणार आहे

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, तळेगाव दाभाडे येथे 26 एप्रिलला 13 वा वर्धापन दिन

**पुणे :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या अथक परिश्रमामुळे बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तळेगाव दाभाडे येथील निवासस्थान दि. 26 एप्रिल 2012 रोजी जनतेसाठी सर्वांकरिता खुले झालेले आहे. तो ऐतिहासिक दिन स्मारक समिती दरवर्षी हर्षोल्लासात वर्धापन दिन म्हणून साजरा करीत आहेत. समितीच्या अध्यक्षा ॲड. रंजना भोसले यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि. 26 एप्रिल 2025 रोजी तळेगाव दाभाडे पुणे येथील स्मारकात 5.30 वाजता साजरा होणार आहे.



प्रमुख अतिथी - अण्णा बनसोडे, उपसभापती, विधानसभा महाराष्ट्र, प्रमुख वक्ते - सुनिल (अण्णा) शेळके आमदार, मावळ विधानसभा, मिलिंद गुंताबाई अर्जुन पानपाटील आणि संचालक केंद्रीय जल आयोग, जलशक्ती मंत्रालय भारत सरकार, दिल्ली. यशवंत मानखेडकर संचालक, नेहरु युवा केंद्र पुणे, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार. या प्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार व परिचय एकपात्री नाट्यप्रयोग 'मी महात्मा फुले बोलतोय'. सादरकर्ते नटश्रेष्ठ कुमार अहेर, एल.डी. कांबळे उपाध्यक्ष, संजय गायकवाड खजिनदार, किसन थुल सचिव, सभासद देवानंद बनसोडे, दिनेश गवई, संतोष मेश्राम, भागवत बिऱ्हाडे, तुकाराम मोरे. सहभाग - विजय कांबळे, श्रावण गायकवाड, आर. डी. शिंदे, गोविंद कदम, अमित भोसले, मधुकर रोकडे, संजय सदावर्ते, पोपट कदम, डॉ. राहुल काशिदे, डॉ. पंकज बनसोडे, अमोल त्रिभवन, नरेंद्र थेंडे, अतुल सोनकांबळे, संजय वाणी, राजेंद्र गडलिंगे, प्रणव रोकडे, राजेंद्र कढरे, अशोक काळे, नरेश भगत, मनोहर पगारे, चंद्रकांत चव्हाण, अमोल गंगावणे, राजू जाधव, पल्लवी सरपाते, सुरेश सरदार, रणजीत सोनवणे, रोहित ओव्हाळ, शिलाताई घोडेस्वार, संतोष सदावर्ते, भास्कर गजभे, सुनिल गायकवाड, पवन गणवीर, राजेंद्र बनसोडे, तडके सर, प्रभाकर निकम, आंभोरे, जगताप, सुनिल वानखेडे, आशिष क्षीरसागर, यशवंत कांबळे, सुभाष वडवरे, उत्तम साळवे, सुनिल खोब्रागडे, अभिजीत काकडे, विलास गायकवाड, राष्ट्रपाल बोदडे, भरत गवळी, वसंत इंगळे, रामराव रामटेके, प्रभा शिंदे, अरुण गायकवाड, रमेश बनसोडे, मोहन बनसोडे, जितेंद्र ख्याले, बसवंत भटारे, तुषार अहिवळे, विकास खडसे, संदिप पिल्लेवार, संतोष सावंत, रावसाहेब कांबळे, अनिल गायकवाड, रुपेश घोडेस्वार, विलास वाघमारे, सुनिता देशनेहरे, विजय मोरे, सागर दुपटे, शैलेस हराळे, किरण शिंदे, आनंद वंजारे, कबीर सोनकांबळे, किरण पगारे, रमेश खोब्रागडे, थोरेंद्र मेश्राम, विलास मानकर, राजाराम धनवडे, राजू जाधव, राहूल शिंदे, प्रभाकर जाधव, विक्रांत घराडे, विजयानंद वायवळ, विनोद जुगदर, शिवाजी चव्हाण, सचिन ससाणे, सुमन गुणडीकर, बाळकृष्ण गायकवाड, सचिन जाधव, आशा दांडगे, अरविंद लोखंडे, जयराम निकाळजे, जिजाभाऊ सोनवणे, दादासाहेब गांगुर्डे, प्रज्ञांकुर निकम, सुनिल गायकवाड, प्रशांत शेगोकर, मीना अवचार, विजयभान बौध्द, शोभा बेंगळे, संजय छडीदार, संजय साखरे, अविनाश कांबळे आदी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य करीत आहेत.




## गोंदियातील अनिकेत वालकरचा आयआयटी खरगपूर वसतिगृहात संशयास्पद मृतदेह

**गोंदिया :** तो बालपणा पासूनच इतका हुशार की वर्गात नेहमी प्रथम क्रमांक पटकवायचा. शालेय शिक्षण झाल्यानंतर गोंदियातील एका खासगी शिकवणीतून त्याने जेइइचा अभ्यासक्रम प्राविन्य सूचित स्थान मिळवून थेट आयआयटी खरगपूर गाठले. येथे नुकत्याच कॅम्पसमध्ये त्याला 24 लाखाच्या पॅकेजवर नोकरी सुद्धा मिळाली होती. सोमवार 21 एप्रिल पासून सुरू होणाऱ्या परीक्षेनंतर तो जॉईन करणार होता. पण अचानक असं काय झाले की गोंदिया येथील कुंभारे नगर (नाना चौक) राहणाऱ्या त्याच्या वालकर कुटुंबाला रविवार 20 एप्रिल रोजी अनिकेत दिपककुमार वालकर यांचा मृत्यू झाल्याची बातमी मिळाली. यामुळे संपूर्ण वालकर कुटुंब पुरते हादरून गेले



## हुसैन दलवाई यांना सातपीर दर्ग्यात मज्जाव

**नाशिक :** नाशिक येथील काठे गल्ली भागात असलेल्या धार्मिक स्थळावर महापालिकेने कारवाई केली आहे. त्यामुळे नाशकात तणाव निर्माण झाला आहे. पोलिसांनी आता कोणत्याही व्यक्तीस सदर धार्मिक स्थळी जाण्यापासून मज्जाव केला आहे. दरम्यान, माजी मंत्री व काँग्रेस नेते हुसैन दलवाई हे आज तिथे पाहणी करण्यासाठी गेले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर दलवाई यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली आणि पोलिसांच्या कारभारावर बोट ठेवले.

हुसैन दलवाई म्हणाले, 'न्यायालयाने तो दर्गा अनधिकृत ठरवलेला नाही. ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तरी माझे म्हणणे आहे की 350 वर्षे जुन्या दर्ग्यावर अशा प्रकारची कारवाई करणे चुकीचे आहे. मी तिथे जाऊन पाहणार होतो, परंतु, पोलिसांनी मला तिथे जाऊ दिले नाही. पोलीस मला म्हणाले, 'तुम्ही आत गेलात तर इतर लोकही जातील. म्हणजेच इथले आमदार जातील. इथल्या आमदार दंगल करण्याच्या मनःस्थितीत आहेत.'

काँग्रेस नेते म्हणाले, 'मी पोलिसांना सांगितले की मी इथे दंगा शमवण्यासाठी आलो आहे. मी दंगा करण्यासाठी आलेलो नाही. समाजात



एकता निर्माण व्हावी यासाठी मी इथे आलो आहे. माझे चारित्र्य संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. त्यामुळे मला तिथे जाऊ द्या. मी केवळ पाच जणांना घेऊन तिथे जाईन. मात्र, पोलीस मला म्हणाले की तिथे गडबड होईल. हेच पोलीस गडबड करणाऱ्यांना संरक्षण देत असतील तर ते चुकीचे आहे.'

दरम्यान, सत्ताधाऱ्यांनी आरोप केला आहे की काठे गल्लीत झालेल्या दंगलीप्रकरणी पोलिसांनी पकडलेल्या आरोपींमध्ये काँग्रेसचे पदाधिकारी आहेत. त्यावर हुसैन दलवाई म्हणाले, कोणीही दंगा केला असेल, पोलिसांवर दगडफेक केली असेल तर मी त्याचे समर्थन करणार नाही. मी गांधीवादी आहे. मी हिंसेचे समर्थन करत नाही. मी काही गोळवलकरवादी किंवा सावरकरवादी नाही. माझी भूमिका लक्षात घ्या. मी अहिंसावादी आहे, दगडफेक करणे मला मान्य नाही. मात्र, पोलिसांचे म्हणणे आहे की तुम्ही आत गेल्यावर इतर लोक तिथे जातील.'




## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या !

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरुपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यावसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

# जागतिक पुस्तक दिन दिल्ली डॉ. आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात साजरा झाला पाहिजे

*स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी विल्यम शेक्सपियर, मिगुएल डी. सर्व्हंटिस, इंका गार्सिलोसो अशा अनेक नामवंत लेखकांचे निधन 23 एप्रिल रोजी झाले म्हणून करण्यात आला. युनेस्कोच्या पॅरिसमध्ये 23 एप्रिल 1995 रोजी झालेल्या जनरल कॉन्फरन्सद्वारे 23 एप्रिल हा जागतिक पुस्तक दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.*

प्रत्येक वर्षी, UNESCO आणि आंतरराष्ट्रीय संस्था पुस्तक उद्योगातील तीन प्रमुख क्षेत्रांचे प्रतिनिधि, ज्यामध्ये प्रकाशक, पुस्तक विक्रेते आणि ग्रंथालये यांचा समावेश असतो. प्रत्येक वर्षी 23 एप्रिलला जागतिक पुस्तक दिन आणि कॉपीराइट दिन हा आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जात आहे. प्रत्येक वर्षी एका शहराला 'वर्ल्ड बुक कॅपिटल' म्हणून निवडले जाते, जिथे वर्षभर साहित्यिक उपक्रम राबवले जातात. 2025 चे वर्ष वर्ल्ड बुक कॅपिटल म्हणून लिस्बन, पोर्तुगाल आहे.

युनेस्कोने अनेक नामांकित आणि प्रख्यात लेखकांची पुण्यतिथी ही जागतिक साहित्याचे प्रतीक म्हणून 23 एप्रिल जागतिक पुस्तक दिन निवडला आहे. परंतु साहित्याचे प्रतीक ज्ञानाचे प्रतीक म्हणून पुस्तक दिन जग साजरा होत असला तरी त्या पुस्तकाची पहिली निर्मिती कोणी केली. त्यातून कोणते साहित्य आणि ज्ञानाचे प्रतीक उमगले हे देखील महत्त्वाचे आहे. कारण जगातील पहिल्या पुस्तकाची निर्मिती बौद्ध धम्माने झाली आहे. हे देखील जगाला विसरता येणार नाही. म्हणून भारताच्या दृष्टीने 23 एप्रिल जागतिक पुस्तक दिनला विशेष महत्व आहे. पुस्तक म्हणजे ज्ञानपेटी! जे आपल्याला वेळोवेळी ज्ञान प्रदान करते. परंतु जगातील पहिले पुस्तक कोणते आणि कोडेक्स' म्हणजे पुस्तकांचा शोध लागल्या पासून त्याचे आयताकृती स्वरूप सर्वसामान्य बनले आणि आजही तेच प्रचलित का आहे? यावर आपण कधी विचार मंथन केले आहे?



**जगातील पहिले पुस्तक -** जगातील पहिले पुस्तक डायमंड सूत्र आहे. चीनच्या छपाई तंत्रज्ञानाच्या विकासानंतर हे पुस्तक इसवी सन 868 मध्ये छापण्यात आले. हे पुस्तक बुद्ध आणि त्यांच्या शिष्यामधील संवाद स्पष्ट करते. हे पुस्तक 1900 मध्ये बौद्ध लेण्यात सापडले. ज्याला चीनच्या डुनहुआंग जवळ हजार बौद्ध लेण्या म्हणून ओळखले जाते. डायमंड सूत्र हा बौद्ध धर्मातील महत्त्वाचा ग्रंथ असून त्याची मूळ प्रत लंडन मधील ब्रिटिश लायब्ररीत ठेवण्यात आली आहे. हे पुस्तक वूडब्लॉक तंत्राचा वापर करून छापण्यात आले.



आनंद म्हस्के
मो. 8652325032

वूडब्लॉक तंत्र म्हणजे काय? तर वूडब्लॉक तंत्र म्हणजे लाकडी ठोकळ्यावर अक्षर आणि प्रतिमा कोरून त्याला शाई लावून कागदावर छपाई करणे याला वूडब्लॉक तंत्र म्हणतात. हे पुस्तक चिनी भाषेत सिद्धम लिपीत छापले असून बौद्ध धम्म मधील पवित्र ग्रंथ आहे. 2025 चे वर्ल्ड बुक कॅपिटल लिस्बन, पोर्तुगाल असले तरी 100 पेक्षा जास्त देशात हा दिवस साजरा होतो. भारतातही या दिवशी शाळा, ग्रंथालये आणि सांस्कृतिक संस्था आणि वाचनाला प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. विल्यम शेक्सपियर, मिगुएल डी. सर्व्हंटिस, इंका गार्सिलोसो यांच्या 23 एप्रिलच्या निधनाने हा पुस्तक दिवस साजरा होत असला तरी एका तारखेला निधन होणे हा योगायोग आहे. पण जगासाठी सिम्बॉल ऑफ नॉलेज असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतका पुस्तक प्रेमी जगात शोधून सापडणार नाही. कारण त्यांच्या इतके कोणीच पुस्तकावर प्रेम केलेले नसेल. कारण एक वेळी माझी धन संपती कोणी लुटून नेली तर त्याला मी एक वेळ माफ करेन पण माझे पुस्तक चोरून नेणाराला मी कधीच माफ करणार नाही. त्याला गोळी घालून ठार करीन. असे म्हणणारे डॉ. बाबासाहेब पुस्तकावर जिवापाड प्रेम करीत होते. पुस्तक आपले मित्र असून त्यांचे मनापासून वाचन सुरू केले की पुस्तक, ग्रंथ आपल्याशी बोलू लागतात. असे डॉ. बाबासाहेब म्हणतात. वाचाल तर वाचाल आणि ज्याच्या घरी नाही पुस्तकाचे कपाट तो होईल भुई सपाट. स्वतःला 20 या 20 पुस्तकात गाडून घेणारे लंडनची लायब्ररी उघडण्या अगोदर जाऊन उभा राहणारे आणि ती बंद होताना सर्वांच्या शेवटी बाहेर पडणारे एकमेव विद्यार्थी डॉ. बाबासाहेब होते. त्यांनी सात वर्षांचा अभ्यासक्रम केवळ अडीच वर्षात पूर्ण करणारे डॉ. बाबासाहेब म्हणतात की माझ्या जवळ ज्ञान घेण्यास वेळ नाही आणि जेवण घेण्यास पैसे नाहीत. इतका ज्ञानलालसी महामानव बुद्धाच्या नंतर जगाने पहिला नाही. केवळ पुस्तकांसाठी पुस्तकांसाठी दोन मजली इमारत उभारून जगातील महान विद्वान अन् तत्वेता गौतम बुद्ध यांच्या राजशाही घराचे नाव राजगृह देणारे डॉ. बाबासाहेब यांनी 12 भाषा आणि 30 डिग्री अवगत केल्या आहेत. त्यांचे मानवी जीवनाचे मूलभूत हक्क आणि कर्तव्य यावर एक लाखाच्या वरती विपुल साहित्य राजगृहात आहे. त्यांचे फक्त 40 खंड प्रकाशित झाले आहेत. अजून बरेच साहित्य प्रकाशित व्हायचे असले तरी राजगृह लोकशाही जगासाठी दीपस्तंभ आहे.

डॉ. बाबासाहेब यांचे जगाच्या पाठीवरी जेथे जेथे पाऊल पडले तेथे आणि नाही पडले तेथे ही त्यांची जगभर स्मारक उभारली आहेत. ही सर्व स्मारक मंदिर, मस्जिद, चर्च या गिरिजा घर नसून ज्ञानाची केंद्र बनली आहेत. ही स्मारक जागतिक लोकशाहीसाठी दीपस्तंभ आहेत. 26 अलीपूर रोड, दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक हे भारत सरकारने डॉ. आंबेडकर यांना समर्पित केलेले आहे. 5 डिसेंबरच्या 1956 च्या रात्री त्यांचे महापरिनिर्वाण झाले. म्हणून याला महापरिनिर्वाण भूमी किंवा महापरिनिर्वाण स्थळ म्हणूनही ओळखले जाते. बुद्ध आणि त्यांच्या शिष्यामधील संवाद असलेले डायमंड सूत्र हे जगातील पहिले पुस्तक आहे. तर बुद्ध यांचे शिष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकातील इमारतीची रचना उघडलेल्या भारतीय संविधानाच्या पुस्तकाप्रमाणे आहे. हा आकार 'ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक' आहे. डॉ. बाबासाहेब यांची स्मारक ही जागतिक लोकशाहीची दीपस्तंभ आहेत. तर भारत सरकारे 23 एप्रिल जागतिक पुस्तक दिन 26 अलीपूर रोड, दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक मध्ये साजरा करून जगाला पुस्तक आणि स्मारक यांची महत्ती पाठवून देण्याची गरज आहे. ■ ■

## अधोगती

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

युद्ध जिंकल्यानंतर कौतुक करणाऱ्यांपेक्षा लढण्यासाठी बळ देणाऱ्या व्यक्ती या आदरास पात्र असतात. सिनेमातील नट, नट्यांपेक्षा आपले आईवडिल अन् निर्वाणीच्या प्रसंगी साथ देणारी प्रत्येक व्यक्ती आपल्यासाठी आदर्श असते. अशा व्यक्तींची चांगले दिवस येताच साथ सोडू नये किंवा त्यांच्या कपड्यांची, गरिबी अन् साधेपणाची लाज वाटायला नको. म्हाताऱ्या अन् अशिक्षित मायबापाची लाज वाटणे यासारखी दुसरी कोणती लाजीरवाणी गोष्ट नाही. ज्यांच्यामुळे आपणांस यश मिळाले, सुखासमाधानाचे दिवस वाट्याला आले त्यांचे श्रेय कधीही एकट्याने लाटण्याचा प्रयत्न करू नये. मदत करणाऱ्या प्रत्येकाची जाणीव ठेवायलाच हवी. कारण या व्यक्तींची साथ अन् जिव्हाळा हा बँकेच्या खात्यासारखा असतो. तुम्ही जेवढे तुमच्या खात्यात जमा कराल, तेवढे तुम्हाला काढता येईल, आपल्याकडून होणाऱ्या छोट्या छोट्या चुकांकडे लक्ष द्यायला शिकावे, कारण आपले इवलेसे छिद्र देखील उद्या मोठ्यात मोठे जहाज बुडविण्यास कारणीभूत ठरू शकते. कारण तुमचे भवितव्य कसे आहे हे तुमच्या वर्तमानातील संबंध अन् व्यवहारावर अवलंबून असते. कधी कधी नकळत अनावधानाने आपल्या हातून काही चुका घडू शकतात पण, जेव्हा दुसऱ्यांदा संधी भेटते तेव्हा अगोदर केलेल्या चुकांची पुनरावृत्ती चुकूनही करू नये. बरीच मंडळी इतरांच्या सहभागाने मिळालेले यश हे केवळ आपल्यामुळेच मिळाले म्हणून त्याची प्रसिद्धी करतो तेव्हा जवळची माणसे कायमचे दुखावल्या जातात. म्हणून प्रसिद्धी मिळवण्याच्या केविलवाण्या धडपडीपेक्षा आदर कमवायचा प्रयत्न करा. कारण प्रसिद्धी क्षणभंगुर असते पण आदर कायमस्वरूपी टिकतो. विद्यापीठाची पदवी ठरवत नाही की, तुम्ही किती माणसे जोडली. ते तुमचे कौशल्य ठरवत असते. माणसाने प्रगती जरूर करावी पण, झालेल्या प्रगतीतून आपण इतरांना काय मदत करू शकतो. असा उद्देश असावा. केवळ स्वतःचा स्वार्थ बघणारा अन् इतरांवर कुरघोडी करण्याचा जो कुणी प्रयत्न करतो त्याच्या या वृत्तीमुळे ना त्याला प्रतिष्ठा लाभते, ना त्याचे यश अन् प्रगती दिर्घकाळ टिकते. इतरांच्या मदतीने मिळालेल्या यशामुळे व्यक्तीमत्व घडते. मिळवलेल्या व्यक्तीमत्वाला सन्मान प्राप्त होतो, पण या सन्मानाचा अहंकार होऊ लागला अन् इतरांच्या योगदानाचा विसर पडू लागला की, अधोगती अटळ आहे हे मात्र नक्की. ■ ■

# धनवंतांचा बुलडोझर आणि गरिबांची वारूळे



पैसा आणि साधने या साऱ्यांच्या अभावी ते आपला जीवनमरणाचा संघर्ष लढवीत आहेत. या संघर्षाचा शेवट कसा होईल याची साऱ्यांना कल्पना आहे आणि तो शेवट आदिवासींचाच असणार आहे. वारूळे जमीनदोस्त करता येतात. पण मुंग्या माराव्याच लागतात. हा नैसर्गिक दुष्टावा आता व्यावसायिक अघोरीपणात रुपांतरित झाल्याचे सांगणारे हे चित्र आहे. आदिवासींच्या या शांततामय व मूक संघर्षाला महाराष्ट्र सरकारच्या एका मूर्ख मंत्र्याने नक्षलवाद्यांचा लढा म्हणून मोडित काढले आहे. विदर्भात हजारो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या या खऱ्या नसून ते अतिरिक्त मद्यपानापायी झालेले मृत्यू आहेत, असे म्हणण्याचे एवढेच मूर्ख धाडस यापूर्वी महाराष्ट्राच्या एका मंत्र्याने केले आहे. हा लढा समाजातील एखाद्या वरिष्ठ मध्यम वा दलित वर्गाचा असता तर त्याच्या बाजूने सारा देश उभा राहिला असता. पण आदिवासींना राज्यात वा देशात कोणी वाली नाही हेच सध्याचे तेथील चित्र आहे.

सरकार उद्योगपतींना सामील, माध्यमे सरकारांना सामील आणि नेते तर आपापली किंमत घेऊन बाजारातच बसले आहेत. अशावेळी एका विधानसभा वा लोकसभा क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींची दखल घ्यावी असे राज्य वा केंद्र सरकारला वाटत नसेल तर त्याचे आश्चर्य आपल्या निर्ढावलेल्या मानसिकतेलाही वाटू नये. आदिवासींचे हे क्षेत्र एका बाजूला नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराने ग्रासले आहे आणि आता दुसऱ्या बाजूने देशातील बड्या उद्योगपतींनी त्यांच्या आयुष्यावर अतिक्रमण चालविले आहे. त्याहून संतापजनक बाब ही की केंद्र व राज्य यातील सरकारे नक्षलवाद्याच्या विरोधाचे नाव घेत उद्योगपतींच्या अतिक्रमणाला साथ देत आहेत. फार वर्षांपूर्वी केंद्र सरकारने इंद्रावती या बारमाही नदीवर भामरागडच्या दक्षिणेला एक महाकाय धरण बांधण्याची योजना आखली होती. ते धरण झाले असते तर त्या क्षेत्रातील मौल्यवान वनसंपत्ती आणि त्या क्षेत्रातील आदिवासींच्या आयुष्याचा विनाश झाला असता. ते धरण होऊ नये यासाठी बाबा आमटे यांनी तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची दीर्घकाळ मनधरणी केली आणि त्यातून ती योजना बारगळली. असाच पण याहून उलट प्रकार चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावतीजवळ झाला. या भद्रावतीला एक मोठा संरक्षण प्रकल्प आहे. कोणत्याही संरक्षणप्रकल्पाच्या आसपास खाणी उभारू नयेत असा अहवाल खाणींचा अभ्यास करणाऱ्या एपीजे अब्दुल कलाम या थोर देशभक्ताच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या संशोधन समितीने केंद्र सरकारला सादर केला होता. मात्र अटलबिहारी वाजपेयी यांच्या 13 दिवसांच्या पहिल्या कारकीर्दीत संरक्षण मंत्री असलेल्या प्रमोद महाजन यांनी या भद्रावतीच्या प्रकल्पालगत एमटा या ओपन कास्ट कोळसा खाणीला मंजुरी दिली. त्या खाणीसाठी जमिनी मिळविण्याचे काम तेव्हाच्या स्थानिक पुढाऱ्यांनी केले. या खाणीचे मालकीहक्क केंद्रातील काही पुढाऱ्यांएवढेच सोमनाथ चॅटर्जी या कम्युनिस्ट नेत्याचेही होते असे सांगितले जाते. ही खाण आजही सुरू आहे आणि तिचा कोळसा वाहून नेण्यासाठी स्थानिक पुढाऱ्यांच्या शेकडो मालमोटारी करारपत्रानुसार काम करत आहेत. भद्रावती हे चंद्रपूर जिल्ह्यातील प्रगत शहर आहे. अशा जागी कलाम समितीला डावलून खाणी खणल्या जात असतील तर गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींसाठी कोण उभा राहील आणि त्यांना कोण संरक्षण देईल.? एक दुर्दैवी स्वरुपाची ऐतिहासिक आणि दुसरी जागतिक पातळीवरची आदिवासीविरोधी घटना येथे नोंदविली पाहिजे. पांडवांचे राज्य वसविण्यासाठी श्रीकृष्णासकट साऱ्या पांडवसेनेने खांडववन जाळले व त्यातील नागा जमातीच्या लोकांची हत्या केली. त्यात जीव बचावून पळालेले नागा थेट आताच्या नागालँडपर्यंत पोहचले. आदिवासींच्या विस्थापनाचा इतिहास असा थेट महाभारतापर्यंत नेता येतो.

**|| सुरेश द्वादशीवार ||**

अलिकडच्या काळात युरोपातून अमेरिकेत गेलेल्या ख्रिश्चन वसाहतदारांनी तेथील रेड इंडियन्सची अशीच सामुहिक कत्तल केली व आपल्या वसाहती कायम केल्या. या घटनेचा पश्चात्ताप पुढल्या काळात फ्रँकलिन डी रुझ्वेल या अमेरिकेच्या अध्यक्षानेच जाहिररित्या व्यक्त केला. हाच प्रकार ऑस्ट्रेलियाचा आहे. तेथे गेलेल्या इंग्रजांनी स्थानिक आदिम जमातींची वन्यप्राण्यांची करावी तशी शिकार केली आणि त्या जमाती नाहिशा केल्या. अलिकडच्या एका ऑस्ट्रेलियन प्रधानमंत्र्याने आपल्या या पूर्वजांच्या पापासाठी तेथील प्राचीन जमातींची जाहिररित्या क्षमा मागितली आहे. आपली राज्ये, आपल्या वसाहती, आपले उद्योग आणि आपले व्यवसाय विस्तारण्यासाठी आदिवासींना देशोधडीला लावतात हा जगाचा इतिहास आहे. आजच्या भारतात आदिवासींच्या जमाती नागालँड, मणिपूर, मेघालय, बंगाल, द. बिहार, उ. ओडिशा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गडचिरोली, यवतमाळ आणि पुढे थेट नंदूरबार धुळे या पट्ट्यात वसल्या आहेत. ही घटना सहज घडलेली नाही. उत्तरेकडील राजवटींनी दक्षिणेकडे हुसकावून लावलेल्या आणि दक्षिणेकडील राजवटींनी उत्तरेकडे हाकलून दिलेल्या दुर्दैवी आदिवासींची ही अंगावर शहारे आणणारी गाथा आहे. हाच प्रकार आता गडचिरोलीत सुरू आहे. या प्रकाराविरुद्ध काही तरूण सामाजिक कार्यकर्ते एकत्र आले आहेत आणि त्यांनी त्याविषयी नियतकालिकांतून लिखाण करणे सुरू केले आहे. त्यांनी आदिवासींचे मेळावे भरविणे आणि सुरजागडच्या प्रकल्पाविरुद्धचा आदिवासींचा आक्रोश जागा करण्याचे काम हाती घेतले आहे. पण हे सारे तरूण उत्साही आणि ध्येयवादी असले तरी निर्धन आहेत. त्यांच्या पाठिशी पैसा नाही, राजकारण नाही, धर्मकारण नाही आणि समाजकारणही नाही. आदिवासींच्या आयुष्यासाठी सुरू असलेल्या या एकाकी लढतीला या देशातील एकाही पक्षाचा वा सामाजिक संघटनेचा पाठिंबा वा आधार मिळू नये ही आपल्या राष्ट्रीय एकात्मतेची शोकात्म कहाणी आहे. आदिवासींच्या या लढ्याची पुस्तकरुपाने कहाणी अविनाश पोइनकर या तरुणाने वर्षा या आपल्या पत्नीसह लिहिली आहे. त्याच्यासोबत त्याच्याचसारख्या अ-राजकीय तरुणांचा एक छोटा समूह आहे. सुरजागडला भेट देणे आणि तेथील जनतेचा आक्रोश जमेल तसा मिळेल त्या नियतकालिकातून प्रकाशीत करणे हे काम हे तरुण अत्यंत निष्ठेने करत आहेत. मात्र ही एका सैतानी सत्तेविरुद्ध मुंग्यांनी दिलेली लढत आहे. ही लढत यशस्वी होणे हे लोकशाहीच्या विजयाचे लक्षण ठरणार आहे. या देशात भांडवलशाहीने जोर धरला आहे. मध्यमवर्ग भुरळलेल्या आणि दिशाहीन अवस्थेत आहे आणि गरिबांना नेतृत्व नाही. अशा काळात ज्यांना काही गमावायचे नाही अशा तरुण पण जाणकारांनी एकत्र येणे आणि गरिबांवरील अत्याचाराचा सामना करणे ही बाब लोकशाहीला दूरचे दर्शन घडविणारी आहे. या लढतीत सहभागी होता आले नाही तरी तिच्याविषयीची सहानुभूती बाळगणे आणि तिला मनोमन सहाय्य करणे हे सगळ्या लोकशाहीनिष्ठांचे कर्तव्य आहे. हे सारे प्रस्तावनारूप लिखाण विकासविरोधी नाही. ते विध्वंसाविरुद्धचे आहे. आर्थिक विकास हा मानवसंवर्धनाच्या प्रक्रियेशी जोडूनही साधता येतो. पुर्नवसनापूर्वी पूर्ववसन ही नवी भूमिका याच विधायक दृष्टीतून जन्माला आली आहे. अविनाश पोइनकर, त्याचे सहकारी आणि सुरजागडची आदिवासी जनता या साऱ्यांच्या लढ्याला माझ्या सर्वंकष शुभेच्छा आहेत आणि त्यांच्यासोबत राहण्याचे अभिवचन मी त्यांना दिले आहे. ■ ■

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय कारकीर्द

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानव मुक्तीची चळवळ सुरू केली. जनजागृतीच्या माध्यमातून आपला विचार जनतेत रूजविला. जनतेत वैदिक संस्कृती विरोधात लाट निर्माण झाली. सर्व शोषित जाती एकत्रित येऊन संघर्ष करावा ही अपेक्षा होती. तसा प्रयत्नसुद्धा करण्यात आला. त्याला काहीप्रमाणात यश आले. मातंग व चांभार जाती एकत्रित येऊन चळवळ सुरू केली. शेतकरी शेतमजूर मिल मजूराची मोट बांधून व्यवस्थेसमोर आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभे केले.*



अखिल भारतीय शेड्यूल कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची सभा बोलावून त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत शेड्यूल कास्ट फेडरेशन पक्ष बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाचे निर्माण करावे असा एकमताने ठराव पारीत करण्यात आला. त्याची विस्तृत बातमी प्रबुद्ध भारत पत्रात छापून आली.
6/12/1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे महापरिनिर्वाण झाले. समाजावर शोककळा पसरली. या दुःखातून सावरण्याआधीच 30/31 डिसेंबर 1956 व 1 जानेवारी 1957 ला शेड्यूल कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची सभा अहमदनगर पुणे येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे होते. पहिल्या दिवशी शोक संदेश देऊन आदरांजली अर्पण करण्यात आली व सभा स्थगित करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सभा सुरूवात झाली व आढावा घेण्यात आला. 1 जानेवारी 1957 ला प्रेसिडीयम तयार करण्यात आली व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांची अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले व सचिव निवडण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले व त्यांनी ॲड. हरिदास आवळे बाबू यांची निवड केली. 1957 ची निवडणूक संयुक्त महाराष्ट्र समिती सोबत युती करण्यात आली व निवडणुकीत भरघोस यश प्राप्त झाले. नागपूर मधून पंजाबराव शंभरकर व कामरेड ए. बी. बर्धन निवडून आले.
3/10/1957 ला शेड्यूल कास्ट फेडरेशनचे अधिवेशन पवित्र दीक्षाभूमीवर घेण्यात आले व रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. रिपब्लिकन पक्षाचे वतीने 1963/64 ला भुमीहीनाचा सत्याग्रह करण्यात आला. सत्याग्रहींना जेल अपूरे पडले त्यांचा परिणाम देशभर झाला. 1967 ला निवडणुका झाल्या. रिपब्लिकन पक्षाला भरघोस यश मिळाले. उत्तर प्रदेश पंजाब व बिहारमध्ये रिपब्लिकन पक्षाचे निवडून आलेले आमदार सरकारमध्ये मंत्री झाले. रिपब्लिकन पक्ष विरोधीपक्ष म्हणून गणना होऊ लागली. दादासाहेब गायकवाड यांनी दिल्ली येथे सभा बोलावून काँग्रेस रिपब्लिकन पक्षाचे युतीचा ठराव मांडला दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नंतर एकमेव नेते होते. त्या ठरावाला विरोध झाला. परंतु दादासाहेब गायकवाड यांच्या प्रभावामुळे ठराव पास झाला. आंबेडकरी मोहल्यात पांढरी टोपी घालून काँग्रेस पक्षाच्या लोकांची हिम्मत होत नव्हती. काँग्रेसचे हरिजन सुद्धा सरळ रस्त्यांनी जाण्याची हिंमत करीत नव्हते. तर मागच्या रस्त्याने प्रवेश करिता होते. इतकी दहशत आंबेडकरी जनतेची होती. ती काँग्रेस व रिपब्लिकन पक्षाचे युतीने कमी केली व सत्तेचे प्रलोभन दाखवून अनेक रिपब्लिकन कार्यकर्त्यांना आपल्या नांदी लावले. जी सत्तेचे विरोधी लढण्याची धार होती ती बोथड झाली.



विनायकराव जामगडे
मो.9372456389

रा. सु. गवई आयुष्यभर सत्तेचे भागिदार राहून पदे भोगली व रामदास आठवले तोच धागा पकडुन सत्तेचे उपभोग घेत आहेत. 1970 ला बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी काँग्रेस रिपब्लिकन पक्षाचे युतीला विरोध केला. म्हणून त्यांना सरचिटणीस पदावरून काढले व ना.ह. कुंभारे यांना रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस केले. राजाभाऊ खोब्रागडे व ॲड. हरिदास आवळे यांनी सोबत येऊन काँग्रेस पक्षाच्या विरोधी भुमीका घेतली व दोघेही जीवनाच्या अंतीम वेळेपर्यंत काँग्रेस पक्षाच्या विरोधी होते. आज आंबेडकरी जनतेचा येथील बुद्धीजिवी लोक काँग्रेसमय करण्याचा विडा उचललेला आहे. तशी मानसिकता तयार करण्याचे प्रसारमाध्यमे करीत आहे व अश्याच लोकांचे लेख प्रामुख्याने छापले जाते. ■ ■

## उपवर्गीकरणात अल्पसंख्यांक जातींचे आरक्षण संपणार



महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीमध्ये 59 जातीचा समावेश असून लोकसंख्या क्षमतेच्या दृष्टीने असमान आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात धर्मांतरित बौद्धांची लोकसंख्या 65,31,200, महार जाती 80,06,060, मांग जाती 24,88,531 चांभार जाती 14,11,072 व उर्वरित 56 जातीची एकूण लोकसंख्या 13,70,235 एवढी आहे. भारताच्या विविध राज्यातील उपवर्गीकरणाचा इतिहास असे स्पष्ट करतो की जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी या न्याय निर्णयानुसार अनुसूचित जातीला प्राप्त 13 टक्के आरक्षणाचे उपवर्गीकरण केल्यास आरक्षणाचा मोठा वाटा संख्येने जास्त असलेल्या धर्मांतरित बौद्ध महार मांग व चांभार या जातींना जाणार व संख्येने अल्प असलेल्या उर्वरित 56 जातींना एकूण आरक्षणाच्या एक टक्के वाटा मिळणार तेव्हा भंगी, बसोर, होलार, खाटीक या जातीसह उर्वरित सर्व जातींचे आरक्षण अल्पसंख्यांक असल्यामुळे संपणार आज एक संघ असल्यामुळे 13 टक्के आरक्षणाचा फायदा प्रत्येक जातीला मिळू शकतो. उपवर्गीकरणानंतर तो मिळणार नाही. महाराष्ट्र शासनाद्वारे आरक्षणाचे उपवर्गीकरण करताना सर्व जातींना कोणत्या जाती गटात सहभागी व्हावे याचे मत स्वातंत्र्य असल्यास धर्मांतरित बौद्ध किंवा महार या जाती गटासोबत गेले पाहिजे तरच अल्पसंखेत असलेल्या जातीचे अस्तित्व अबाधित राहील. अल्पसंख्यांक जातीला मत स्वातंत्र्य नसल्यास संविधानिक आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला विरोध केला पाहिजे. अन्यथा आरक्षण हा विषय अल्पसंख्यांक जातीसाठी संपलेला असेल.

**- प्रवीण मेश्राम, मो. 9422949638**

## उपवर्गीकरण म्हणजे राज्याद्वारे जाती-जातीमध्ये व्देशाची पेरणी



अनुसूचित जाती मध्ये 59 जाती आहे अनुसूचित जातीच्या संविधानिक आरक्षणाचे उपवर्गीकरण म्हणजे राज्याद्वारे देश निर्माण करण्याचा व भेद निर्माण करण्याचा सरकारचा मा. सर्वोच्च न्यायालयामार्फत केलेला निर्णय होय. अनुसूचित जातीमधील सर्व जाती लोकसंख्या, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या असमान आहेत त्यांचा फायदा मनवादी लोकांनी उचलून जाती-जातीत भ्रम निर्माण केला की आरक्षणाचा फायदा बौद्ध व महारजातींनी घेतलेला आहे. त्यामुळे त्यांचा शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये वाटा मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. व तुमच्या आरक्षणाचा लाभ सुद्धा त्यांनीच घेतलेला आहे या चुकीच्या व भ्रमक आधारावर काही जातींनी एक संघ आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातीचा एक संघ आरक्षणाचे उपवर्गीकरण केल्यास वर्णव्यवस्थेचा प्रचंड आघात सोसलेल्या, अन्याय अत्याचाराविरुद्ध एकसारखा संघर्ष केलेल्या जाती-जातीमध्ये आपसात भेद व द्वेष निर्माण होईल आरक्षणाच्या अंमलबजावणी करिता भांडणाऱ्या जाती उपवर्गीकरणा एकमेकांशी भांडतील त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरण न करता मागे राहिलेल्या जातींच्या विकासाची धोरणे राबविले पाहिजे म्हणजे त्या जाती आरक्षणाचा लाभ घेण्याकरिता सक्षम होतील. परंतु या जातींचे उपवर्गीकरण केल्यास प्रत्येक जात दुसऱ्या जातीची शत्रू होऊन आपसात द्वेष, ठेवा व मस्त पेरण्याचे कार्य शासनाद्वारे होईल.

**- देवेंद्र यावले, मो. 9730196927**

## राज्याद्वारे, उपवर्गीकरणात अनुसूचित जातीला सामाजिक न्यायाची अपेक्षा



दिनांक 1 ऑगस्ट 2024 रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दविंदर सिंह विरुद्ध पंजाब राज्य या याचिकेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या एकसंघ संविधानिक आरक्षणाचे राज्य करू उपवर्गीकरण शकते असा निर्णय दिलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या निर्णयात असे स्पष्ट केले आहे की, 'उपवर्गीकरणासह कोणत्याही प्रकारच्या होकारार्थी कृतीचे उद्दिष्ट मागासवर्गीयांसाठी मौलिक समानता प्रदान करणे हा आहे.' या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे अनुसूचित जातीच्या संविधानिक आरक्षणात उपवर्गीकरण प्रक्रिया सुरू आहे. अनुसूचित जातीमध्ये 59 जाती असून लोकसंख्या सामर्थ्याने असमान आहेत तसेच सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय दृष्टीने सुद्धा असमान आहेत यात शंका नाही. तरीसुद्धा सर्व जाती ह्या एकजिनसी असल्यामुळे संविधानात त्यांच्याकरिता एक अनुसूची (शेड्युल) बनवून 13 टक्के एकसंघ आरक्षणाचे प्रयोजन केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे अनुसूचित जातीच्या एकसंघ 13 टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड याप्रमाणे उपवर्गीकरण करणार आहे त्यामुळे राज्याद्वारे कोणत्याही जातीवर अन्याय न करता अनुसूचित जातीमधील 59 जाती गटांना त्यांच्या संख्या सामर्थ्यानुसार अ, ब, क, ड याप्रमाणे उपवर्गीकरण केल्यास न्यायाची प्रस्थापना होते. परंतु अनुसूचित जातीचा महाराष्ट्र राज्यात सेवा क्षेत्रातील एक टक्के व आर्थिक क्षेत्रातील तीन टक्के पेक्षा अनुशेषाचे प्रमाण आहे त्यामुळे राज्याद्वारे उपवर्गीकरण करताना अनुसूचित जातीला प्राप्त 13 टक्के आरक्षणाऐवजी 15 टक्के आरक्षणाचे प्रयोजन करून उपवर्गीकरण केल्यास सामाजिक न्यायाची प्रस्थापना होईल. अन्यथा अनुसूचित जातीमधील काही जातींचा विकास झाला या चुकीच्या धारणेवर त्यांचा वाटा कमी करून वेगवेगळ्या जाती गटात उपवर्गीकरण केल्यास हा एकसंघ जातीवर शासनाद्वारे लाभलेला निर्णय असेल.

**- वैशाली खांडेकर, मो. 7350074139**

## उपवर्गीकरण जाती व्यवस्था मजबूत करण्याचे षडयंत्र



दिनांक एक ऑगस्ट 2024 रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया चालू आहे.
भारतात इंग्रजांनी 1931 च्या जनगणने अस्पृश्यांना प्रथम सूचीबद्ध केले असून अनुसूचित जाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशन ने तयार केली. 1935 च्या कायद्यातील ऑर्डर इन कौन्सिल या भागाला ती जोडलेली आहे. त्यानंतर प्रदेशात झालेल्या प्रादेशिक बदलानुसार अनुसूचित जातीच्या यादीमध्ये बदल होऊन आज अनुसूचित जातीमध्ये 59 जातीचा समावेश आहे. हिंदू समाज व्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या जातींचे अन्याय अत्याचारापासून संरक्षण करण्याकरिता आणि संधीची समानता देऊन राष्ट्रीय विकासात प्रतिनिधित्व निर्माण करण्याकरिता अनुसूचित जातीची एक अनुसूची (शेड्युल) बनवून त्यांच्या करिता आरक्षणाचे प्रयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्यात अनुसूचित मध्ये एकूण 59 जातीचा समावेश आहे त्यापैकी कोणत्याही जातीला स्वतंत्र आरक्षण नाही तर त्या अनुसूची मध्ये समाविष्ट असलेल्या जातीला आरक्षण आहे. आरक्षणाच्या उपवर्गीकरणानंतर अनुसूचित जाती मधील जातींचे गट हे आरक्षणाचे हकदार बनतील जसे की महार जाती गट, मांग जाती गट, चांभार जाती गट, भंगी जाती गट उपवर्गीकरणानंतर असे अनेक जाती गट प्रबळ होतील.
मा. सर्वोच्च न्यायालयाने दिशा निर्देश असले तरी राज्याकडे सर्व समस्यावर उपाय शोधणारे तज्ञ असतात उपवर्गीकरण न करता विकासात मागे राहिलेल्या जातींच्या विकासाकरिता राजाने वेगवेगळ्या योजना राबवून त्यांचा विकास केला पाहिजे. उपवर्गीकरणाद्वारे विकास करण्याचे भासवून जाती मजबुत करण्याचे कटकारस्थान, षडयंत्र राज्याद्वारे राबविले जात आहे हे सर्व जातींनी समजून घेतले पाहिजे.

**- गोपिका खोब्रागडे**

## अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण



हजारो वर्षापासून ज्या जातींना अस्पृश्य म्हणून गणल्या गेले. अस्पृश्य ही जात हिंदु धर्माचा घटक असूनही त्यांना हिंदु धर्माच्या जाचक नियमामुळे त्यांना मानवी अधिकारापासून वंचित ठेवल्या गेले. परिणामी त्यांच्यात संपत्ती, मानवी स्वाभीमान यांचा अभाव निर्माण झाला. शिक्षणापासून वंचित ठेवल्याने त्यांना ज्ञान प्राप्त करून घेता आले नाही. परिणामी अस्पृश समाज हा पूर्णतः मागासलेला राहीला. तो गुलामगिरीत अधिका अधिक गाडला गेला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून अनुसूचित जाती. अनुसूचित जाती, इतर मागासर्गीय आणित अल्पसंख्यांक अशी वर्गवारी करून त्यानूसार त्यांना आरक्षणाचे प्रावधान त्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थितीनुसार बहाल केले. अनुसूचित जातीतील बौध्द सोडून इतर जाती हिंदु धर्माच्या ऋढी, परंपरा, हिंदुची मान्यता व हिंदुनी ठरवून दिलेल्या चाकोरीने आपले जीवन जगू लागले व आजही जगत आहे. परिणामी त्यांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक व राजकीय परिवर्तन घडून आले नाही. बौध्द पूर्वाश्रमीचा महार यांनी स्वतःमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या धम्माप्रमाणे आचरण करू लागले. परिणामी त्यांच्यात सुधारणा दिसू लागल्या. हा परिणाम डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेल्या विचारांचा व त्यानुसार अंगीकृत करून जीवनात उतरविण्याचा परिणाम आहे. महार/बौध्द व्यतिरिक्त इतर जातींनी आपल्या जीवनात अपेक्षीत अशी प्रगती केली नाही. हा त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना नाकारल्याचा परिणाम आहे. हे सत्य आहे पण हे स्वीकारण्यास महार/बौध्द सोडून इतर अनुसूचितील जातीची मंडळी तयार नाही. म्हणून त्या मंडळींने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करावे हा मुद्दा लावून धरला आहे. पण उपवर्गीकरणानंतरही त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलाव वा विकास होणार नाही असे माझे ठाम मत आहे. केवळ अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण अनुसूचित जातीच्या अंतर्गत जाती-जाती मध्ये भांडण लावणे, संभ्रम निर्माण करण्याचा कुटील डाव आहे. कोणत्याही प्रकारचा सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रगती वा विकास हा विधायक विचाराणे व आचरणाने प्रज्ञायुक्त वर्तनानेच होतो. जातीचे वर्गीकरण करणे हा त्यावरील उपाय निश्चितच नाही. दुखणे वेगळे आणि उपचार वेगळा हेच अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणा बाबत म्हणता येईल.

**- योगीराज इंगोले**

“ सौम्य शब्दांनी कठोर हृदये देखील जिंकता येतात... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

### उदारमतवादी पोप फ्रान्सिस

पोप फ्रान्सिस हे एक प्रगल्भ सुधारक आहेत. परंतु त्यांचा दृष्टिकोन आणि कार्यशैलीमुळे व्हॅटिकनमध्ये आणि बाहेरही त्यांना विरोधाचा सामना करावा लागला आहे. पोप फ्रान्सिस हे एक प्रगल्भ सुधारक आहेत. परंतु त्यांचा दृष्टिकोन आणि कार्यशैलीमुळे व्हॅटिकनमध्ये आणि बाहेरही त्यांना विरोधाचा सामना करावा लागला आहे. पोप फ्रान्सिस यांचे आज (21 एप्रिल) निधन झाले. कासा सँटा मार्टा या व्हॅटिकनमधील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते 88 वर्षांचे होते. कार्डिनल होर्गे मारिओ बेर्गोलियो यांची 2013 मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांना पोप फ्रान्सिस म्हटले जाते. पोपपदी येणारे युरोपबाहेरचे ते पहिले व्यक्ती होते. पोप फ्रान्सिस हे रोमन कॅथलिक चर्चचे नेतृत्व करणारे पहिले लॅटिन अमेरिकन आणि पहिले जेसुइट होते. जेव्हा त्यांची 266 व्या पोपपदी निवड झाली. त्यावेळी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. पोप म्हणून निवड होताना फ्रान्सिस हे 76 वर्षांचे होते. अभ्यासकांना एखाद्या तरुण व्यक्तीची निवड होईल अशी अपेक्षा होती. त्यांच्या निवडीच्या वेळी, त्यांना चर्चच्या रुढीवादी आणि सुधारक दोन्ही गटांकडून मोठा पाठिंबा मिळाला होता. कारण लैंगिक विषयांवर त्यांची मते पारंपारिक होती, आणि सामाजिक विषयांबाबत ते उदारमतवादी मानले जात होते. त्यांच्या समर्थकांना त्यांची साधी वागणूक आणि क्यूरिया (व्हॅटिकन प्रशासन) मध्ये सुधारणा करण्याचा त्यांचा उत्साही निर्धार आवडला होता. व्हॅटिकन बँकतील भ्रष्टाचार उखडून टाकण्याची त्यांची भूमिका, चर्चमधील बाल लैंगिक शोषणाच्या प्रकरणांशी संबंधित विषयांवर उपाययोजना करण्याचे त्यांचे प्रयत्नही पसंत पडले होते. पोपपदाच्या चार वर्षांनंतर झालेल्या सर्वेक्षणात पोप फ्रान्सिस यांनी कॅथलिक आणि इतर धर्मीयांमध्येही चांगली लोकप्रियता मिळवल्याचे दिसून येते. त्यांना ट्विटरवर तब्बल 15 मिलियन्सपेक्षा जास्त फॉलोअर्स आहेत. परंतु प्रत्येक मुद्द्यांवर थेट भाष्य करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे व्हॅटिकनमध्ये आणि बाहेरही त्यांच्या विरोधकांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढली. त्यांनी चर्चचे अधिकृत धार्मिक पुस्तक असलेल्या कॅटेकिझममधील साधा स्वल्पविरामही बदलला नाही. त्यांनी महिला पाद्रींना नकार दिला, समलिंगी विवाहाला नाही म्हटले, गर्भपाताला सर्वात भयानक गुन्हा म्हणाले, गर्भनिरोधकावरील बंदीचे समर्थन केले. महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक वादग्रस्त मुद्द्यांवर बोलताना त्यांनी स्वतःला ‘चर्चचा निष्ठावान पुत्र’ म्हणून संबोधित केले.’ व्हॅटिकन प्रशासनात सुधारणा आणण्यासाठी त्यांनी उचललेली कठोर पावले आणि पुनर्विवाहानंतरच्या मुद्द्यांवर चर्चची भूमिका नरम करण्याची त्यांची तयारी यामुळे त्यांच्या अधिकारांना विरोध करणाऱ्यांमध्ये वाढ झाली. त्यांच्या मतांशी सहमत नसलेल्या कार्डिनल्सना बदलण्यामध्येही त्यांनी कधी संकोच बाळगला नाही. होर्गे मारिओ बेर्गोलियो यांचा जन्म 17 डिसेंबर 1936 रोजी ब्यूनस आयर्समध्ये इटालियन वंशाच्या कुटुंबात झाला. त्यांच्या अधिकृत व्हॅटिकन चरित्रानुसार, त्यांना 1969 मध्ये जेसुइट म्हणून नियुक्त केले गेले. नंतर त्यांनी अर्जेंटिना आणि जर्मनीमध्ये शिक्षण घेतले. ते 1992 मध्ये बिशप झाले आणि 1998 मध्ये ब्यूनस आयर्सचे आर्चबिशप बनले. 2005 च्या कॉन्क्लेव्हमध्ये त्यांच्याकडे पोपपदाचे दावेदार म्हणून पाहिले गेले होते. कार्डिनल बेर्गोलियो या नात्याने, त्यांच्या उपदेशांचा अर्जेंटिनामध्ये नेहमीच प्रभाव पडला. त्यांनी अनेकदा समाजातील सर्व समावेशकतेवर भर दिला. या भूमिकेकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारांवर त्यांनी अप्रत्यक्षपणे टीकाही केली. पोप फ्रान्सिस यांनी जंटा सरकारच्या (लष्करी अधिपत्याखालील राजवट) काळात चुकीच्या गोष्टी केल्याचे आरोप व्हॅटिकनने नाकारले आहेत. ■ ■

बहुजन सौरभ

---

**परवा बंगल्यावर थूल सर व गायकवाड सर ऑडिटचे काम करत होते. मी प्रोजेक्टर सेटिंग करायचे म्हणून बंगल्यावर आलो होतो. काम चालू असताना थुल सरांना कोणाचा तरी फोन आला. समोरच्या व्यक्तीने विचारलू वाटते कुठे आहात? त्यावर सरांनी जे उत्तर दिले ते ऐकून खरेच धन्यता वाटली. त्यांनी उच्चारलेले दोनच शब्द सर्व भीमाच्या लेकरांच्या भावना व्यक्त करणारे होते. बा भीमाच्या या वास्तूचा गौरव करणारे होते.**




## बापाचा बंगला

सर उत्तरले, म्हणाले, ‘बापाच्या बंगल्यावर’. दोनच शब्द पण किती ताकद सामावली त्यांच्यात. केवढी ऊर्जा मिळते हे शब्द ऐकून. एका लेकराने बापाच्या वास्तुला दिलेली मानवंदनाच ती. ‘बापाचा बंगला’ अप्रतिम शब्द आहे हा.
या बंगल्यात तुम्ही प्रवेश केल्यावर, डाव्या बाजूला असलेल्या डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करता. नतमस्तक होऊन तुम्ही त्या हॉलमधे लावलेली डॉ. बाबासाहेबांची छायाचित्रे न्याहाळत असता. ती छायाचित्रे तुम्हाला मातीतून जन्मलेल्या या महामानवाने आकाशाला घातलेल्या गवसणीची साक्ष देतात. अशा महान व्यक्तिमत्वाच्या वास्तूत आपण उभे आहोत याचा सार्थ अभिमान वाटू लागतो. समस्त मानव जातीला कल्याणकारी ठरवी अशी भारतीय राज्यघटनेची काही कलमे त्यांनी येथे लिहिली हे तुम्हाला समजते अन् त्या वास्तूचा तुम्हाला वाटत असलेल्या अभिमानाचे रूपांतर आदरात होते. हळूहळू तुम्ही आतल्या दालनांमध्ये प्रवेश करता, तस तशी येथे वास करत असलेली डॉ. बाबासाहेबांची ऊर्जा, त्यांची स्पंदने तुम्हाला जाणवू लागतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करत रहा एक क्षणही आळस येणार नाही. ऊर्जेच्या सिद्धांतप्रमाणे ती निर्माण करता येत नाही किंवा ती नष्टही करता येत नाही. ती फक्त एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात बदलता येते. इथल्या कणकणामध्ये डॉ. बाबासाहेब आहेत. ही वास्तू, त्यांचे सामान सगळ्यात, सगळ्यात डॉ. बाबासाहेब सामावलेत. ज्या वास्तू त्यांनी वापरल्या त्यांना परिसस्पर्श झाल्याची भावना मनात निर्माण होते. डॉ. बाबासाहेबांचा स्पर्श झाल्याने या सर्व गोष्टी ‘चिरंजीव’ झाल्यात. पुढच्या हॉलमधे तुम्ही येता. तेथे स्मित हास्य करत असलेली तथागतची मूर्ती दिसते. त्यांची ती मुद्रा पाहून नकळत तुम्ही हात जोडता, वंदन करता. बाजुला जाऊन डोळे बंद करुन शांतपणे बसता. तुमचे चित्त एकाग्र होते, स्थिर होऊ लागते. या वास्तूला कोणी डॉ. बाबासाहेबांचे निवासस्थान म्हणतात, कोणी डॉ. बाबासाहेबांचा बंगला म्हणतात, कोणी बाबासाहेबांचे घर म्हणतात. पण ‘बापाचा बंगला’ याची सर कशालाच येत नाही. आज बापाचा बंगला लोकांना खुला करण्यात आला आहे. त्या घटनेला 26.04.2025 रोजी 13 वर्ष पूर्ण होत आहेत. सनदशीर लढा देऊन ही वास्तू आपल्याला मिळाली. या पावन लढ्यात तन, मन, धनाने अत्यंत समर्पक भावनेने अविरत परिश्रम घेतलेले स्मारक समितीचे सचिव आदरणीय किसन थूल सर व समितीच्या अध्यक्षा आदरणीय ॲड. रंजनाताई भोसले यांचे योगदान खुप मोठे आहे. वर्धापनदिना निमित्त माझ्याकडून व माझ्या कुटुंबाकडून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, संचालक मंडळ, कार्यकर्ते आणि सर्व आंबेडकरी जनतेस हार्दिक शुभेच्छा. ■ ■

– किरण शिंदे

---



रणजित मेश्राम
मो. 9890020789

## ..तू ‘साल्या’!




एक गाणे ऐकत होतो. गाणे खेचक आहे.. ,

**मतदार केले तुला**
**हकदार केले तुला**
**माणसात बसवूनी**
**माणूस केले तुला**
**तरी तू साल्या**
**बेईमान झाला**
**माझ्या बाबासाहेबाला...**

या गाण्यातील ‘साल्या’ चा जोर कुणावर ते कळते. तो आपल्याच माणसांना म्हणतो आहे. तसे ‘साल्या’ वगैरे म्हणणे तसेही उचित नाही. पण हा भाव वेगळा.
पण अलीकडचे तरुण प्रबोधनकार ‘साल्या’ शब्दाच्या फार प्रेमात दिसतात. अर्वाच्यतेकडे संवाद चाललाय. प्रसिध्द प्रबोधनकार अशोक सरस्वती यांनी याच विषयाला धरून बहुजन सौरभ मध्ये ‘आंबेडकरी प्रबोधनकार यांची जबाबदारी वाढली’ हा लेख लिहिला. त्या लेखातून या प्रकाराचे गांभीर्य लक्षात येते. त्यांनी काही घटना नमूद केल्या आहेत. ते लिहितात, अकोल्यातील एका आंबेडकरी प्रबोधनकाराने म गांधी यांचा गातांना अपमानजनक उल्लेख केला. परिणामी स्टेजवर वादंग झाले. पोलिसांनी पोलिस संरक्षणात गायकाला पोलिस ठाण्यात नेले. ही घटना नांदगाव खंडेश्वर येथील आहे. दूसरी घटना बालाघाट, मध्यप्रदेश येथील आहे. प्रसिध्द प्रबोधनकारासोबत घडले. पोलिसांनी हस्तक्षेप केला. गायकाला विलंबाने जामीन मिळाले.
अशोक सरस्वती यांनी याच संदर्भात एका गायिकेचाही उल्लेख केला. ती साल्या वगैरे शब्दांचा वापर करते, यावर तीव्र नापसंती व्यक्त केली. अशीच नापसंती महिला नेत्या उज्वला गणवीर यांनी मागे एक लेख लिहून व्यक्त केली होती. असे प्रकार फार वाढू नये. गायक गायिका तरुण आहेत. समज देता येईल. उत्साहाला सांभाळावे लागेल. ■ ■

---

# हिंदूंनो.. मग मुस्लिम धर्म स्वीकारायचा का ?

**आज आपल्या देशात हिंदू-मुस्लिम वाद सद्यस्थितीत शिगेला पोचलेला आहे. वाद करू नका म्हंटल तर आपल्यालाच सुनावतात की हिंदूंनाच का सांगता? मुस्लिमांबद्दल बोलण्याची हिम्मत नाही वगैरे. हे कट्टरवादी हिंदू संघटनांचे लोक जेव्हा सरसकट मुस्लिम धर्माविरोधात बोलतात तसेच आपल्या धर्माविरुद्ध जेव्हा एखाद्या मुस्लिम आतंकवादी संघटनेचा नेता भाषणात बोलतो तेव्हा आपल्या मनात काय भाव उत्पन्न होतात? त्या धर्माविषयी प्रेम निर्माण होते की घृणा? त्याच्याबद्दल आपुलकी वाटते की द्वेष उफाळून येतो? ते लोक जे बोलत आहेत तेच जर तुम्हाला बोलायचे-करायचे आहे तर तुम्हीही त्यांचाच धर्म स्वीकार करून व्हा ना त्या आतंकवादी संघटनांमध्ये सामील.**

भारताला हिंदूंचा तालिबान बनविण्याच्या का मागे लागलात? का हिंदू धर्मासारख्या प्रेमळ आणि सर्वसमावेशक धर्माला दहशत, भय निर्माण करणारा धर्म बनविण्याच्या मागे लागलात? इराण, इराक, पाकिस्तान, अफगाणिस्तान सारख्या कट्टर धार्मिक देशांची अवस्था आपण बघतच आहोत, आपल्या देशाला का त्या मार्गावर नेताय? बरे या महाभागांना काहीही सांगितले की यांची उत्तरे ठरलेली असतात. समाजात विखारी प्रचार करतानाही यांची वाक्ये:- 1) ते मुस्लिम बघा न एकमेकांसाठी कसे एकत्र येतात. 2) ते मुस्लिम लोक त्यांच्या धर्माला बघा न किती महत्व देतात. 3) ते मुस्लिम कसे आपल्या मुलांना धार्मिक शिक्षण देतात. 4) आपल्या धर्मासाठी बघा न मुस्लिम लोक कशी वर्गणी देतात. 5) बसमध्ये त्यांची महिला उभी असली की कसे स्वतः उभे राहून तिला पटकन जागा करून देतात. 6) मुस्लिमांसोबत आपले भांडण झाले की कसे त्यांचे लोक पटकन एकत्र जमतात. 7) ते बघा न कसे 5 वेळ नमाज पढतात. 8) दर शुक्रवारी मस्जिदमध्ये जातातच, आपण तर वर्षातून 4-5 वेळाच देवळात जात नाही. 9) आपले लोक असे का वागत नाहीत? 10) आपल्या लोकांमध्ये मुस्लिमांसारखी जागृती नाही वगैरे वगैरे. (ही सर्व मी स्वतः ऐकलेली वाक्ये आहेत, इतर अनेक असतील)
अश्यांना प्रत्येकच गोष्ट परधर्मीय जशी करतात तशीच पाहिजे म्हणतांना आपण आपल्याच धर्माची बदनामी करत आहोत असे यांना का वाटत नसेल? तुलना करताना हे लोक अप्रत्यक्ष म्हणत असतात की आपल्या धर्मापेक्षा तो धर्म किंवा तो धर्म पाळणारे लोक अधिक उत्तम आहेत. वरून कहर म्हणजे कोणतीही मिरवणूक असो यांना मस्जिदी समोरच नाचायचे असते, मंदिरासमोर यांना नाचावेसे वाटत नाही. मस्जिदिवरच भगवे झेंडे लावायचे असतात, मस्जिदीवरच गुलाल फेकायचा असतो. आपली जी मंदिरे अस्तित्वात आहेत तिथे आयुष्यात कधी जाऊन पूजा-अर्चा करणार नाहीत. पण मस्जिदिखालीच मंदिरे शोधायची असतात. याच सर्व गोष्टी दुसऱ्या देशात दुसऱ्या धर्मियांनी हिंदूंसोबत केल्या तर यांना आवडतील का?




रंग किंवा गुलालाबद्दल मला नेहमी वाटते की मुस्लिमांनी मस्जिदिवर गुलाल उडाला म्हणून चिडून जाऊ नये. गुलाल घाण वस्तू नाही, आनंदाच्या वेळी उधळायची पवित्र वस्तू मानली जाते. त्यामुळे उधळा किती उधळता तर आम्ही साफ करून घेऊ अशीच भूमिका घेतली पाहिजे. हिंदूंनीही मंदिरावर हिरवा रंग उडाला म्हणून संतापण्याचे कारण नाही, ती काही शेणासारखी किंवा मांसासारखी घाण नाही की मंदिर अपवित्र होईल आणि अशा क्षुल्लक गोष्टींनी जर आपला देव-अल्लाह-धर्म अपवित्र होत असेल तर आपण स्वतःच्याच देव-धर्माला अशक्त आणि असमर्थ म्हणून जगासमोर मांडत आहोत हे लक्षात घ्या.
मग वर दिल्याप्रमाणे सर्व गोष्टी जर आपल्याला मुस्लिमांसारख्याच पाहिजेत तर मग तुम्हीच मुस्लिम धर्म स्वीकारा ना. म्हणजे कसे सगळे मुस्लिम जसे करतात तसे होईल. कशाला हिंदू धर्म महान असल्याचे गोडवे गाता? आपल्याच भावांच्या मनात त्यांच्याबद्दल द्वेष का भरताय? प्रत्येकाच्या धर्मातील पद्धतींमध्ये तफावत असली तरी प्रत्येकच धर्माची शिकवण-सार एकच आहे ते म्हणजे माणुसकी जपणे. प्रत्येकच धर्मात वाईट प्रवृत्तीची माणसे (समाजकंटक) कमी-जास्त प्रमाणात असतातच आणि कोणत्याही समाजाची स्थिती त्याच्या धार्मिक कट्टरतेवर नाही तर त्यांच्या सामाजिक सुधारनेवरून ठरत असते. कट्टरता कोणतीही असो ती माणुसकीला रसातळालाच नेणार. आज सरसकट सर्व मुस्लिमांना शिव्या घालताना, त्यांना आतंकवादी जमात म्हणताना आपण विचार करत नाही की आज आपल्या देशात 20 कोटी मुसलमान आहेत. यापैकी फक्त 1टक्के मुस्लिम म्हणजे फक्त 20 लाख मुस्लिम जरी आतंकवादी असते तर या देशाची काय अवस्था असती? आपल्या देशाचे सक्रीय सैन्य जे आहे ते साडे 14 लाख आहे. देश कोणत्या अवस्थेत असता आपला? आपण हे समजून घेत नाही. स्वातंत्र्यलढ्यात लाखो मुस्लिमांनी सहभाग घेतला, हजारो फासावर गेले, हजारो आझाद हिंद फौजेत भरती होऊन ब्रिटिशांविरोधात या देशासाठी लढले, अशा अनेक पिढ्या देशाशी प्रामाणिक असणाऱ्यांना वारंवार आतंकवादी म्हणून हिणवले गेल्यावर त्यांची मानसिकता काय होईल? त्यांना या देशातील हिंदू आणि हिंदू धर्माबद्दल प्रेम उत्पन्न होईल की घृणा?
आपण काय बोलतो, कसे वागतो त्यावरून आपल्या धर्माची प्रतिष्ठा ठरत असते. मध्यंतरी एका वैद्याने शेण खाल्ल्याने कोरोना आणि अनेक रोग दूर होतात असे सांगून रोज शेण खायला सांगितले, स्वतः सुद्धा खाल्ले, त्यातून त्याला इन्फेक्शन झाले आणि दवाखान्यात भरती करावे लागले. कुणीही मनोहर कुलकर्णी उर्फ संभाजी भिडे उठतो आणि म्हणतो आंबे खाल्ल्याने पोरे होतात. कुठे तर कृष्णाला शाळेत घातले जाते आणि त्याच्या परीक्षेचा निकालही येतो. जगन्नाथ पुरी मंदिरात भगवान जगन्नाथाची तब्बेत खराब होते आणि डॉक्टर देवाच्या मूर्तीला तपासतात, इलाज करतात. दिल्लीतील एक कुलगुरु मॅडम कॉलेजच्या भिंतींना शेण फासतात. या अशा आपल्या कृतींनी-वक्तव्यांनी आपण जगासमोर आपल्याच धर्माचे हासे करून घेतो. पण अशा हिंदू धर्माची बदनामी करणाऱ्यांविरोधात हे कट्टर हिंदुत्ववादी कधीच बोलत नाहीत की तुमच्यामुळे हिंदू धर्माची खिल्ली उडवली जाते. तुम्हीही धर्माची बदनामी थांबवा म्हणून. यावर काही महाभाग म्हणतात, बाकीच्या धर्माचे लोक पण काही-बाही बोलतात, त्यांना तुम्ही काही म्हणत नाही. पण अहो, ते शेण खातात म्हणून आपण पण खाल्लेच पाहिजे काय? त्यांच्यात आपल्यात फरक आहे की नाही? ते जसे करतात आपल्यालाही सगळे तसच करायचे आहे काय?



चंद्रकांत झटाले
मो. 7769886666

प्रत्येक व्यक्तीला आपण कुणाचा प्रचार करावा, कुणाला समर्थन करावे. याचे स्वातंत्र्य आहे. परंतु आपल्या स्वार्थाकरिता करीत असलेल्या गोष्टीमुळे आपला धर्म तर बदनाम होत नाही ना याचेसुद्धा भान यांना राहात नाही. लाखो हिंदूंना फसवणारा, स्वतःच्याच भक्त असणाऱ्या हिंदू स्त्रियांवर बलात्कार करणाऱ्या आसाराम सारख्या ढोंगी साधुमुळे यांचा धर्म बदनाम होत नाही तर यां आसारामला वाईट म्हणणाऱ्यांमुळे यांचा धर्म बदनाम होतो. वाईटाला वाईट म्हटल्याने कधीच कोणता धर्म बदनाम नाही. निदान आमचा हिंदू धर्म तरी नाहीच. ‘विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ’ हे मानणारा आमचा वारकऱ्यांचा हिंदू धर्म आहे. परंतु एकीकडे वसुधैव कुटुंबकम म्हणायचे आणि दुसरीकडे परधर्मियांना शिव्यांची लाखोली वाहायची. त्यांना मारून टाकण्याच्या वल्गना करायच्या मग तुमच्यात आणि तालिबान्यांमध्ये फरक तो काय? काही बेरोजगार हिंदू युवक गोवंश वाचविण्यासाठी धडपडताना दिसतात. त्यासाठी प्रसंगी मारामारी करून स्वतःवर गुन्हे दाखल करून घ्यायलाही ते तयार असतात. पण अशांना मला विचारावे वाटते की भावांनो या देशात सर्वात मोठे 5 कत्तलखाने हिंदूंचे आहेत जिथे रोज लाखो गायी कापल्या जातात. संपूर्ण जगात जितकी बीफची (गायीचे मांस)मागणी आहे त्यातील 50टक्के गोमांस हा आपला भारत देश जगाला पुरवतो. त्यामुळे तुम्ही आधी सरकारला कडक कायदा करून हे कत्तलखाने बंद करायला लावा. म्हणजे रोज लाखो गायी कटण्यापासून वाचतील. हे काय 8-15 दिवसातून 2-4 गायी वाचवता? रोज लाखो गायी कापुनही त्या कत्तलखान्यांच्या हिंदू मालकांचा धर्म बुडत नाही, मग तुमचा धर्म 2-4 गायींमुळे धोक्यात का? तुम्हाला ह्या राजकारण्यांकडून मूर्ख बनवले जातेय हे समजून घ्या.

क्रमशः ■ ■

---

# बुद्धांना सृष्टी सौंदर्याची आवड

त्यांना सौंदर्यप्रिय बुद्धच म्हणावे. म्हणून त्यांनी आपल्या अनुगामींना सांगितले की सौंदर्याच्या सहवासात रहावे. भिक्खूंना उद्देशून ते म्हणाले, भिक्षूंनो, अनुदित सद्धम्माचा उदय किंवा उदित अधम्माचा लोप करण्यास समर्थ ठरेल अशी सौंदर्याच्या स्नेहाइतकी कोणतीही गोष्ट नाही. जो सौंदर्याचा स्नेही आहे, त्याच्या ठाई अनुदित सद्धम्माचा उदय होतो किंवा उदित अधम्माचा लोप होतो, अधम्म आणि अधम्माच भक्ती लोप पावते. सद धम्माबद्दल अप्रति लोक पावते. सद्धम्माबद्दल प्रिती वृद्धिंगत होते. भिक्खूंनो, अनुदीत ज्ञान शाखा उदित होऊ नये म्हणून किंवा उदित ज्ञान शाखा पूर्णत्वास जाऊ नये म्हणून अनियोजित दृष्टीसारखे समर्थ तत्त्व मला माहित नाही. हे भिक्खूंनो, ज्याची दृष्टी अनियोजित आहे त्याच्या बाबतीत त्याची ज्ञान शाखा उदित झाली नसेल तर कदाचित उदित होणारच नाही आणि उदित झाली असेल तर कधीही पूर्णत्वाप्रत जाणार नाही. ‘भिक्खूंनो, आप्त संबंधितांचा अभाव ही क्षुल्लक हानी होय. परंतु प्रज्ञेची हानी सर्व हानीत मोठी हानी होय.’ भिक्खूंनो, आप्त स्वकीयांची वृद्धी हा क्षुल्लक लाभ होय. परंतु प्रज्ञेची वृद्धी हा सर्वात मोठा लाभ होय. म्हणून भिकूंनो, माझे तुम्हाला सांगणे आहे की, तुम्ही प्रज्ञावान व्हावे, तुम्ही प्रज्ञा प्राप्त करावी. यासाठी निरंतर साधना करावी. धनसंपत्तीची वृद्धी भिखुंनो हा क्षुल्लक लाभ होय. पण प्रज्ञेची वृद्धी हा सर्वात मोठा लाभ होय. म्हणून भिक्खूंनो, माझे तुम्हाला सांगणे आहे की, तुम्ही प्रज्ञावान व्हावे. तुम्ही प्रज्ञा प्राप्त करावी. यासाठी तुम्ही निरंतर साधना करावी. भिखूंनो, कीर्ती लोप पावणे ही क्षुल्लक हानी होय, परंतु प्रज्ञेची हानी ही सर्वात मोठी हानी होय. एकदा तथागत शाक्य जनपदात शाक्यांची नगरी सकर येथे वास्तव्याला होते. तेव्हा स्थवीर आनंद तथागताकडे आला. त्याने तथागतांना वंदन केले आणि तो तथागता निकट बसला. असा बसला असताना आनंद तथागतांना म्हणाला, ‘तथागता, अर्धश्रेष्ठ जीवन म्हणजे सौंदर्याशी मैत्री होय.’ असे म्हणू नये. आनंद, असे म्हणू नये. हे अर्ध नव्हे पूर्ण श्रेष्ठ जीवन होय. ही सौंदर्याची मैत्री. सौंदर्याचा सहवास. सौंदर्याची उत्कट निकटता, हे पूर्ण श्रेष्ठ जीवन होय. जो सौंदर्याचा मित्र आहे, सौंदर्याचा सहवासी आहे, सौंदर्याच्या उत्कट (अतिशय) निकट आहे अशा भिक्खुकडून अपेक्षा आहे की, तो आर्य अष्टांगिक मार्गाचा विकास करील. तो आर्य अष्टांगिक मार्गावर अधिकाधिक प्रगती करेल आणि आनंद, असा भिख्खू आर्य अष्टांगिक मार्गाचा कसा विकास करतो? तो आर्य अष्टांगिक मार्गावर अधिकाधिक प्रगती कसा करतो? आनंद, तो सम्यक दृष्टी विकसित करतो. तो त्याग, विरागी, विराम यावर आजीवित असतो, ज्याची परिणती आत्म समर्पणात होते. तो सम्यक संकल्प आधारित आणि संबंधित सम्यक वाणी, सम्यक कर्मांत, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती तसेच सम्यक समाधीची साधना करतो. तयाची परिणती आत्मसर्पणात होते.’ ‘आणि जो भिक्खू सौंदर्याचा मित्र आहे, सहवासी आहे, निकट स्नेही आहे, तो अशा प्रकारे आर्य अष्टांगिक मार्गाचा विकास करतो आणि त्या मार्गावर उत्तरोत्तर प्रगती करतो.’
सौंदर्याची मैत्री, सहवास, निकट स्नेह, याचे जीवनात काय महत्त्व आहे हे तुला समजण्याचा हाच मार्ग आहे. खरेच आनंद, जीवमात्र नाशवंत आहेत, मरते आहेत मर्त्य आहेत, दुःख, शोक आणि विपदाग्रस्त आहेत. परंतु त्याची सौंदर्याशी मैत्री त्यांच्या मुक्तीचे निमित्त होय. सौंदर्याशी मैत्री, सहवास, उत्कट स्नेही त्याचे जीवनात किती महत्त्व आहे, हे समजण्यासाठी आनंद, हाच मार्ग आहे.’ असे बुद्ध म्हणतात. ■ ■




तथागतांची सत्य गाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

---

# जिजाऊ रथयात्रा – एक प्रेरणादायी प्रवास

**मराठा सेवा संघाच्या वतीने 18 मार्च 2025 ते 1 मे 2025 या 45 दिवसांच्या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात जिजाऊ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेचे नेतृत्व संभाजी ब्रिगेडचे महासचिव शिवश्री सौरभ खेडेकर करीत असून त्यांच्यासोबत मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्राचार्य अर्जुनराव तनपुरे पूर्णवेळ उपस्थित आहे. मित्रांनो, आजपर्यंत आपल्या देशात वेगवेगळ्या कालखंडात बऱ्याच यात्रा निघालेल्या आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी यात्रेचे आयोजन वेगवेगळ्या समाज घटकांनी केलेले आहे.**




काही यात्रा पायी होत्या, काही सायकलवर होत्या, काही बैलबंडीने होत्या, काही चार चाकी वाहनाने होत्या तर काही पायी आणि वाहनाने एकत्रित होत्या. प्रत्येक यात्रेचे उद्दिष्ट, हेतू, ध्येय वेगवेगळे होते. कोणतीही यात्रा निघाल्यानंतर त्या यात्रेचा उद्देश आणि हेतू काय आहे यावर त्या यात्रेचे मूल्यमापन केले जाते. काही यात्रा विधायक हेतूने काढल्या जातात तर काही यात्रेचा हेतू हा विघातक असतो. काही यात्रा एकात्मता निर्माण करण्यासाठी असतात तर काही यात्रा कटुता निर्माण करण्यासाठी असतात. काही यात्रा वैयक्तिक स्वार्थासाठी काढल्या जातात तर काही यात्रा लोकहितासाठी काढल्या जातात. काही यात्रा दुरावा व द्वेष निर्माण करण्यासाठी असतात तर काही यात्रा एकसंघ, एकजीव व एकजूट होण्यासाठी असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यात्रा कोणीही जरी काढली असली तरी त्या यात्रेच्या माध्यमातून समाजाला जोडले जाते की तोडले जाते यावरून त्या यात्रेचे परीक्षण केले जाते व त्यावरच त्या यात्रेचे यश-अपयश अवलंबून असते. कधीकधी तोडणाऱ्याला जास्त यश प्राप्त होते आणि जोडणाऱ्याला पाहिजे त्या प्रमाणात यश मिळत नाही. त्यामुळे जोडणारा निराश होण्याची शक्यता असते. परंतु जोडणाऱ्यांनी निराश न होता एक गोष्ट नेहमीसाठी लक्षात ठेवली पाहिजे की, तोडणाऱ्याचे यश हे क्षणभंगुर असते. ते फार टिकाऊ नसते. त्यातून सर्वसामान्य माणसांना कोणताही फायदा होत नसतो. काही काळ लोक तोडणाऱ्यांचा उदो उदो करतात, त्यांना डोक्यावर घेतात, त्यांचा जयजयकार करतात, त्यांचे समर्थनही करतात; परंतु काही काळानंतर जेव्हा सत्य आणि वास्तविकता लोकांच्या लक्षात येते, तेव्हा तोडणाऱ्यांची अवस्था इतकी वाईट होते की, ते ज्यांना आपल्या जवळचा व बाजूचा समर्थक समजत होते, ते लोकही त्यांच्यासोबत बोलण्यास तयार नसतात. तोडणारा विचार हा माणसांची मने दुखावणारा असतो. एकमेकांना एकमेकांपासून दूर नेणारा असतो. दोन व्यक्तींमधे दरी आणि दुरी निर्माण करणारा असतो. त्यामुळे तोडणाऱ्याचे काम हे विघातक असते. त्या तुलनेत जोडणाऱ्याला यश प्राप्त करण्यासाठी उशीर लागतो. प्रचंड संघर्ष करावा लागतो. खूप मेहनत करावी लागते. जवळच्या लोकांसोबत विरोध घ्यावा लागतो. मित्र, नातेवाईक अनेकदा त्यांच्या विरोधात जातात. परंतु शेवटी विजय मात्र जोडणाऱ्याचाच होत असतो. त्यामुळे ज्या लोकांना शाश्वत यश पाहिजे असते त्यांनी सदैव जोडणाऱ्या विचारांसोबत राहिले पाहिजे. जोडणाऱ्या लोकांना सहकार्य केले पाहिजे. भगवान गौतम बुद्धांनी सदैव तोडण्याची भाषा करणाऱ्या अंगुलीमाल डाकूला जोडणाऱ्याचे महत्व लक्षात आणून देऊन त्याचे विचार परिवर्तन केले होते. म्हणूनच मराठा सेवा संघ ही संघटना सदैव जोडणाऱ्या विचारांची भाषा करते. माणसाला माणसाशी जोडण्याचा प्रयत्न करते. 35 वर्षापासून ही संघटना या देशातील विविध जाती समूह व धर्माच्या लोकांना संघटित व एकत्रित करून देशहिताच्या व लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेसाठी लोकांना प्रबोधन करीत आहे. वेळोवेळी विविध उपक्रम, कार्यक्रम, प्रबोधन, परिसंवाद, आंदोलन, मोर्चे व वेगवेगळ्या विषयांवर यात्रा आयोजित करून समस्त बहुजन समाजाला एका माळेत गुंफण्याचा प्रयत्न करीत असते. मित्रांनो, यश किंवा अपयश याचा अजिबातही विचार न करता आपण फक्त आणि फक्त चालत राहिलो पाहिजे. आपण जोडणाऱ्या दिंडीचे वारकरी झालो पाहिजे. अवघी एकाचीच विण! तेथे कैसे भिन्नाभिन्न!! या जगद्गुरु संत तुकोबांच्या जोडणाऱ्या विचारातून समस्त मानवजातीमध्ये एकात्मता व सर्वधर्मसमभाव निर्माण झाला पाहिजे या उदात्त हेतूने मराठा सेवा संघ ही चळवळ क्रांतीपुरुष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनात 35 वर्षापासून माणसाला माणसाशी जोडण्याचे विधायक काम करीत आहे. याच पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघाने माणूस जोडणारी ही जिजाऊ रथयात्रा 18 मार्च ते 1 मे या कालावधीत सौरभ खेडेकर यांच्या नेतृत्वात संपूर्ण महाराष्ट्रात काढलेली आहे. एक उदात्त हेतू व राष्ट्रहिताचा विचार घेऊन या जिजाऊ रथयात्रेचे आयोजन, नियोजन व प्रयोजन आहे. त्यामुळे समस्त बहुजन समाजाने सर्वकष विचार करून या रथयात्रेच्या संदर्भात माहिती जाणून घ्यावी, आपले मतप्रदर्शन करावे व आपणास या रथयात्रेच्या बाबतीत जे चांगले, वाईट, सकारात्मक, नकारात्मक, उणीवा, दोष दिसतील ते खुल्या मनाने न घाबरता स्पष्टपणे व्यक्त करावे अशी आम्ही आपणास विनंती करीत आहोत....



प्रेमकुमार बोके
9527912706

क्रमशः ■ ■